नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०२/१२/२०२३ (शनिवार)**

**(दुपार)**

---

# स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची धडाकेबाज कार्यवाही

## (बकरी चोरी करणारी तिसरी टोळी जेरबंद,बकरी चोरांचे धाबे दणानले, १० गुन्हयांचा उलगडा)




नागपूर ग्रामीण घटका अंतर्गत बकरी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्या करीता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात दोन विशेष पथके तयार केले. या विशेष पथकाने बकरी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांना पकडण्याचा धडाका लूवन तिसरी टोळी ताब्यात घेतली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने तांत्रीक पुराव्यांच्या आधारे व गोपनिय मुखबिराने दिलेल्या माहितीवरुन दि. ०१/१२/२०२३ रोजी कळमेश्वर हद्दीतुन सोहेल वल्द मेहबुब शहा वय २० वर्ष, रा. वार्ड नं.

१४, चिचपुरा, सावनेर जि. नागपूर ह.मु. व्दारश्री पप्पू याचे घरी किरायाने बिसमिल्ला मस्जीदजवळ, माजरी, पिवळी नदी, यशोधरा नगर, नागपूर याला ताब्यात घेतले. सोहेल व त्याचे इतर दोन साथीदार १) नावेद शेख वय २४ वर्ष रा. गांधीपुतळा, इटाभ्टी चौकजवळ, यशोधरा नगर, नागपूर आणि २) राजा वय अं. २२ वर्ष रा. माजरी, पिवळी नदी, यशोधरानगर, नागपूर यांनी ग्रामीण जिल्हयातील बरेच ठिकाणी बकरी चोरीच्या घटना केल्याचे समोर आले आहे. सोहेल याला एल.सी.बी. च्या पथकाने पकडल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथकना वेद व राजा यांचा शोध घेत आहे. सोहेल व त्याच्या साथदारांनी बकरी चोरी केल्यानंतर त्यांची विक्री करुन जी रक्कम प्राप्त केली होती, त्या रक्कमेपैकी सोहेलकडून ६०,०००/— रुपये रोख जप्त करण्यात पोलीसांना यश आले आहे. सोहेल च्या टोळीने खालील प्रमाणे नागपूर ग्रामीण हद्दीत एकुण १० ठिकाणी बकरी चोरीचे गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

१) पो.स्टे. कळमेश्वर अप.क्र. ९१४/२०२३ कलम ३७९ भादवि
२) पो.स्टे. सावनेर अप.क्र. २४२/२०२३ कलम ३७९ भादवि
३) पो.स्टे. रामटेक अप.क्र. १३७/२०२३ कलम ३७९ भादवि
४) पो.स्टे. काटोल अप.क्र. १२९२/२०२३ कलम ३७९ भादवि
५) पो.स्टे. मौदा अप.क्र. ०५/२०२३ कलम ३७९ भादवि
६) पो.स्टे. मौदा अप.क्र. ६७४/२०२३ कलम ३७९ भादवि
७) पो.स्टे. मौदा अप.क्र. ६७५/२०२३ कलम ३७९ भादवि
८) पो.स्टे. खापरखेडा अप.क्र. ०८/२०२३ कलम ३७९ भादवि
९) पो.स्टे. खापरखेडा अप.क्र. १६/२०२३ कलम ३७९ भादवि
१०) पो.स्टे. खापरखेडा अप.क्र. ६०/२०२३ कलम ३७९ भादवि

यापुर्वी दि. २८/११/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रुपेश पाली व सोहेल शेख यांच्या दोन टोळयांना जेरबंद करुन तब्बल १५ गुन्हे उघडकिस आणले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सात त्याने बकरी चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळत असल्याने अशा गुन्हेगारांचे धाबे दणानले असून बकरी चोरी करणारे गुन्हेगार शहराचे बाहे रपळून गेले तर काही भुमिगत झाल्याची माहिती हाती लागली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या या धडाकेबाज कार्यवाहीमुळे ग्रामीण भागातील गोरगरीब जनता समाधान व्यक्त करीत आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, आशिषसिंह ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक बटूलाल पांडे,सहा. फौजदार ज्ञानेश्वर राऊत, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, विनोद काळे, ईक्बाल शेख, राजेन्द्र रेवतकर, रोशन काळे, प्रमोद भोयर, शंकर मडावी, उमेश फुलबेल, नितेश पिपरोदे, संजय भदोरिया, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे, मुकेश शुक्ला तसेच सायबर सेलचे पोलीस नायक सतिष राठोड, संगीता वाघमारे, यांनी पार पाडली.

# गुटखा तंबाखुची अवैध वाहतुकीवर कार्यवाही १० लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त



पोलीस ठाणे केळवद येथे दिनांक ०२.१२.२०२३ रोजी अप.क्र. २०२३ कलम कलग १८८२७२,२७३,३२८, भारतीय दंडविधान संहीता-१८६०, सहकलम २६ (२) (प), २६ (२) (पा), २७ (३) (ई), ३०(२) (ए), ५९ अन्न सुरक्षा व मानक अधिनियम-२००६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्ह्यात १ वाहन, गुटखा, पानमसाला आणि सुगंधीत तंबाखु, मोबाईल, आणि नगदी पसे असा एकुण १०,२४,६३०/- रूपयाचा मुद्देमाल जप्त आहे.

पोलीस ठाणे केळवद हद्दीत खुर्सापार आरटीओ बॅरल येथे राष्ट्रीय महामार्ग ४७ वर मिळालेल्या गोपनीय माहीतीप्रमाणे नमुद घटनास्थळी मिळून आलेल्या मारोती सुझुकी इको कार क्र. एम. एच. ३१ ई.के. ००९३ ची पंढ व मिळुन आलेले दोन ईसम **नामे १. सुनिल बोधाजी भिमटे वय ५० वर्ष रा. जरीपटका नागपूर २. मेहेंद्र श्यामशंकर पाठक वय ३२ वर्ष रा. नारा नागपूर ३. शंकरलाल तनवानी रा. पांडुर्णा म.प्र. यांची पंचासमक्ष** घटनास्थळी मोक्यावर पाहणी केली असता, **त्याचंचेकडे**

1- रजनीगंधा २ खरड्याचे मोठे बॉक्स **किंमती १,१७,६०० रुपये,**
2- पांढ-या रंगाचे प्लास्टीकमध्ये रिमझीम सुगंधीत तंबाखु एकूण ६ पोते **किंमती ३६,३०० रुपये,**
3- पांढ-या रंगाचे प्लास्टीकमध्ये SGR 2000 पान मसाला एकुण १८ पोते, **किंमती १,९७,४६० रुपये,**
4- काळ्या रंगाच्या सिलबंद गोल आकाराच्या सिलबंद डब्यात BABA Black सुगंधीत तंबाखु एकुण ६ डब्बे **किंमती ९५१० रुपये**

5- सुगंधीत तंबाखु एकूण ८ पोते, **किंमती ५२,८०० रुपये**

6- बागबान सुगंधीत तंबाखु एकुण ६ पिशवी **किंमती ३४,८०० रुपये**

7- ४ प्लास्टीक पोत्यात राजश्री पान मसाला **किंमती २९,१६० रुपये**

8- ८ प्लास्टीक पोत्यात राजश्री पान मसाला मोठी पुडी **२५ पॉकेट किंमती ६८,००० रुपये**

9- ६ प्लास्टीक पोत्यात डबल ब्लॅक १८ सुगंधीत तंबाखु **१०० पॉकेट किंमती १५,००० रुपये**

10- नगदी ५८,०००/-रूपये

11- पांढ-या रंगावी मारोती सुझुकी इको कार क्र. एम. एव. ३१ ई.वो. ००९३ किमत ४,००,०००/-रूपये

12- **आरोपींचे ३ मोबाईल एकुण किंमत ६००० रुपये**

**असा माल मिळुन आल्याने आरोपी १. सुनिल बोधाजी भिमटे वय ५० वर्ष रा. जरीपटका नागपूर २. मेहेंद्र श्यामशंकर पाठक वय ३२ वर्ष रा. नारा नागपूर ३. शंकरलाल तनवानी रा. पांडुर्णा म.प्र. यांचेविरुध्द पो.स्टे. केळवद येथे** कलम १८८,२७२,२७३,३२८ भारतीय दंडविधान संहीता-१८६०, सहकलम २६(२) (i),२६ (२) (iv), २७ (३) (ई), ३० (२) (ए), ५९ अन्न सुरक्षा व मानक अधिनियम २००६ प्रमाणे गुन्हा **नोंद करण्यात आला असुन आरोपी क्र. १ व २ यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पो.स्टे. केळवद चे ठाणेदार श्री. साखरकर हे करीत आहेत.**

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स.पो.नि. अमित पांडे विशेष पोलीस पाकि नागपूर ग्रा. व पो.हवा. ६६१ ललीत उईके, पो.ना. ६३० प्रणय बनाफर, पो.शि. २२६२ कार्तीक पुरी, पो.शि. ३४३ बालाजी बारगुले, पो.शि. ११८१ शुभम मोरोकर यांनी केली असुन एक फरार आरोपीचा शोध घेणे सुरु आहे.

## भिवापूर येथे रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या गुन्हेगारांवर कार्यवाही

पो.स्टे भिवापूर येथील राष्ट्रीय महामार्ग क्र 353 (ड) रोडने पो.स्टे. भिवापूर येथील पो.उप.नि .संदीप सडमेक हे पेट्रोलींग करीत असताना कोणीतरी टिप्पर चालक रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे अशी गुप्त माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीचे आधारे त्यांनी भिवापुर कडून उमरेड कडे जाणाऱ्या टिप्परचा पाठलाग करुन रेती वाहतुक करणाऱ्या टिप्परला थांबविले. टिप्पर चालकास विचारपुस करुन टिप्परची तपासणी केली असता टिप्परमध्ये अवैधरित्या अंदाजे 06 ब्रास रेती प्रतीची चोरटी वाहतुक करताना मिळुन आला. सदर कार्यवाहीमध्ये अंदाजे 6 ब्रास रेती प्रति ब्रास 5000 रू. प्रमाणे एकुण 30,000 रू. व एम.एच 40 बी.जी 5604 वाहन किं 20,00000 रू.असा एकून 20,30,000 रू चा मूदेमाल जप्त करुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपी 1) टिप्पर ट्रक क्र. MH-40 .BG- 5604 चा चालक नामे– प्रफुल मनोज शंभरकर वय 26 वर्ष रा तास ता. भिवापुर जि. नागपुर 2) क्लीनर नामे – प्रेम प्रमोद गेडाम वय 20 वर्श रा तास ता. भिवापुर जि. नागपुर 3) टिप्पर मालक नामे–मंगेष जुनघरे रा कावरापेठ उमरेड ता. उमरेड जि. नागपुर यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## मोटर अपघात

दि. 29/11/2023 रोजी पो.स्टे. कुही अंतर्गत उंद्री शिवारात मो.सा.क्र. एम.एच. 40 सि.आर. 2661 चा चालक संदिप खाडे हा त्याचा चुलत भाऊ राहुल लक्ष्मण खाडे यास मागे बसवुन नागपूर वरुन उंद्रीला आपले गावी जात असता उंद्री शिवारात समोर जात असलेल्या कारला कारला ओव्हरटेक करतांना मागुन धडक कारला मागुन धडक लागल्याने मागे बसलेला राहुल लक्ष्मण खाडे हा खाली पडुन गंभीर जखमी झाला होता. तो. दि. 01/12/2023 रोजी दवाखान्यात उपचारादरम्यान मरण पावला. पो.स्टे. ला अप.क्र. 279/23 कलम 279, 338, 304 अ भादवि. अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करुन पुढील तपास स.पो.नि. सोनकुसरे पो.स्टे. कुही हे करीत आहेत.